## नि.क्र. १५९ वर आदेश
## (दिनांक १९.१२.२०२०)

प्रतिवादी क्रं. १ ते ४ यांनी अतिरिक्त मुद्ये काढण्याकरीता सदरचा अर्ज सादर केला आहे. प्रतिवादी क्रं. १ ते ४ यांच्यातर्फे ॲड. श्री. डी. ए. पौळे यांनी असा युक्तीवाद केला की, वादींनी सन १९९३ मधील दिवाळीमध्ये वादी आणि प्रतिवादी यांच्यात वादातील मालमत्तेसंबंधी वाटणी झाली होती व सदरच्या वाटणीप्रमाणे त्यांना त्यांचा हिस्सा मिळाला होता याबाबत त्यांच्या वादपत्रातील परिच्छेद क्रं. १३ व १४ मध्ये कथन केलेले आहेत. तसेच वादींनी त्यांच्या वादपत्रातील परिच्छेद क्रं. २७ यात असे कथन केले आहे की, सन १९९३ मधील तोंडी वाटणीप्रमाणे प्रतिवादी क्रं. ६ ला आलेला हिस्सा प्रतिवादी क्रं. १ ने ठेवला असून प्रतिवादी क्रं. १ ला आलेला हिस्सा प्रतिवादी क्रं. ६ ने सन २००६ रोजी ठेवून घेतलेला आहे. पुढे त्यांनी असा युक्तीवाद केली की, प्रतिवादी क्रं. १ ते ४ यांनी त्यांचा लेखी जबाब नि. क्रं. ५८ यातील परिच्छेद क्रं. ५० यामध्ये वादींनी त्यांच्या दाव्यातील मालमत्तेचे बाजारभावाप्रमाणे मुल्यांकन केलेले नाही व त्याप्रमाणे योग्य ती न्यायालयीन फी लावलेली नाही याबाबत कथन केलेले आहे. तसेच परिच्छेद क्रं. ५१ यामध्ये वादींचा दावा हा मुदतीत नाही असे सुध्दा कथन केलेले आहे. पुढे त्यांच्या वकिलांनी असा युक्तीवाद केला की, लेखी जबाब नि. क्रं. ५८ यातील परिच्छेद क्रं. ५३ यामध्ये प्रतिवादी क्रं. १ ते ४ यांनी असे कथन केले आहे की, वादींनी मौजे कोपारा येथील वडीलोपार्जित मालमत्तेमधील घर क्रं. १७० आणि शेत सर्वे क्रं. ७१ हे ज्या व्यक्तींनी खरेदी घेतली आहे त्या व्यक्तींना सदरच्या दाव्यात आवश्यक पक्षकार म्हणून समाविष्ट करण्यात न आल्यामुळे सदरचा दावा खारीज होण्यास पात्र आहे. पुढे त्यांनी असा युक्तीवाद केला की, सदरच्या प्रतिवादी क्रं. १ ते ४ यांनी वादींनी त्यांच्याविरुद्ध कोणतेही कारण नसताना सदरचा दावा दाखल करुन त्यांना त्रास दिल्यामुळे त्यांच्याकडून सदरच्या प्रतिवादींना नुकसान भरपाईची रक्कम रु. २५,०००/– देण्याची मागणी त्यांच्या लेखी जबाबात केलेली आहे. पुढे त्यांनी असा युक्तीवाद केला की, नि. क्रं. ६२ अन्वये न्यायालयाने मुद्ये निश्चित केले आहे. परंतू वरील उपस्थित केलेल्या बाबींवर मुद्ये निश्चित करण्यात आलेले नाहीत. तरी सदर अर्जाच्या परिच्छेद क्रं. ६ यात नमुद केलेले प्रस्तावित सहा मुद्ये हे निश्चित करावे ज्यामुळे न्यायालयासमक्ष वस्तुस्थिती ही

पुराव्याच्या आधारे समोर येईल. पुढे त्यांनी अशी विनंती केली की, सदरचा अर्ज मंजूर करुन अतिरिक्त मुद्दे निश्चित करण्यात यावे.

२)        वादींतर्फे श्री. व्ही. एस. शेळके वकिलांनी असा युक्तीवाद केला की, प्रतिवादी क्रं. १ ते ४ यांनी सदरचा अर्ज दावा लांबविण्याकरीता दाखल केला आहे. सदरील न्यायालयाने नि. क्रं. ६२ अन्वये जे मुद्दे निश्चित केलेले आहेत त्यात प्रतिवादी क्रं. १ ते ४ यांनी मागणी केलेले प्रस्तावित अतिरिक्त मुद्दे हे समाविष्ट आहेत. प्रतिवादी क्रं. १ ते ४ यांनी त्यांच्या लेखी जबाबात योग्य ते कथन न केल्यामुळे त्या अनुषंगाने अतिरिक्त मुद्दे निश्चित करणे योग्य होणार नाही. वादींनी त्यांचा पुरावा सादर केल्यानंतर व प्रतिवादी क्रं. ६ च्या उलटतपासानंतर प्रतिवादी क्रं. १ ते ४ यांनी सदरचा अर्ज सादर केला आहे. त्यामुळे प्रतिवादी क्रं. १ ते ४ यांनी त्यांच्या अर्जात परिच्छेद क्रं. ६ यामध्ये नमुद केलेले प्रस्तावित मुद्दे हे दाव्याशी निगडीत नसल्यामुळे ते ग्राहय धरण्यात येवू नये. पुढे त्यांनी असा युक्तीवाद केला की, सदरचा अर्ज खारीत करण्यात यावा.

३)        सदरचे प्रकरण हे घोषणा व कायमचे मनाई हुकूमाकरीता दाखल केला आहे. तसेच वादींनी वाटणी, वेगळा ताबा व रक्कम परत मिळण्याकरीता पर्यायी मागणी केली आहे. वादींच्या वादपत्राचे अवलोकन केले असता त्यातील परिच्छेद क्रं. १३ मध्ये सन १९९३ च्या दिवाळीमध्ये संयुक्त कुंटूंबाच्या मालमत्तेच्या वादी क्रं. १, प्रतिवादी क्रं. १ आणि प्रतिवादी क्रं. ६ यांच्यात तोंडी वाटण्या झाल्या होत्या आणि त्या अनुषंगाने त्यांना त्यांचा हिस्सा मिळाला होता, ही बाब परिच्छेद क्रं. १३ व १४ यामध्ये कथन केलेले आहेत. सन १९९३ रोजीच्या तोंडी वाटणीबाबत अतिरिक्त मुद्दे निश्चित केल्यास वादींचे कोणतेही नुकसान होणार नाही. तसेच प्रतिवादी क्रं. १ ते ४ यांनी त्यांच्या लेखी जबाबात वादींचा दावा हा मुदतीत नाही, वादींनी सदरच्या दाव्याचे मुल्यांकन बरोबर केले नसून त्यावर योग्य ती न्यायालयीन फी जोडलेली नाही, असे कथन केले आहे. त्यामुळे सदरच्या बाबींवर अतिरिक्त मुद्दे निश्चित केल्यास वादींचे कोणतेही नुकसान होणार नाही. त्याचप्रमाणे प्रतिवादींनी त्यांच्या लेखी जबाबात वादींनी त्यांच्या दाव्यात आवश्यक पक्षकार न जोडल्यामुळे वादींचा दावा खारीज होण्यास पात्र आहे व वादींनी त्यांच्याविरुद्ध खोटा दावा दाखल केल्यामुळे त्यांना वादींकडून नुकसान भरपाई मिळण्यात यावी असे सुध्दा कथन केलेले आहे. सदरच्या बाबींवर सुध्दा अतिरिक्त मुद्दे निश्चित केल्यास वादींचे कोणतेही नुकसान होणार

नाही. कारण वादींचा अद्याप पुरावा पुर्ण झालेला नाही. त्यामुळे वरील सर्व मुद्यांवर अतिरिक्त मुद्दे निश्चित केल्यास वादी व प्रतिवादी यांच्यातील असलेला मुळ वाद हा पुराव्याच्या आधारे न्यायालयासमक्ष येईल व सदरचा दावा हा निकाली काढतांना न्यायालयास मदत होईल. त्यामुळे मी खालील प्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

१. अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. अतिरिक्त मुद्दे हे नि. क्रं. ६२ यावर निश्चित करण्यात येतात.

(आदेश खुल्या न्यायालयात घोषित करण्यात आला.)

Digitally signed by Amol Ramchandra Surve
Date: 2020.12.19 16:53:44 +0530

अहमदपूर
दिनांकः– १९.१२.२०२०

(अ.रा. सुर्वे)
दिवाणी न्यायाधीश, व. स्तर,
अहमदपूर.